माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचे अमूर्त संबोधाबाबतचे आकलन-एक अभ्यास

कविता संपतराव मोरे
मु. पो. गारगोटी ता.भुदरगड, जि. कोल्हापूर

सारांश

शालेय स्तरावर अध्ययन अध्यापनाच्या अनेक समस्या दिसून येतात. विद्यार्थ्यांना विषय शिकत असताना ब-याचदा त्याला आशयातील संबोध न समजल्यामुळे अध्ययनात अडचणी येतात व तो मागे पडतो . यासाठी सदर संशोधनात माध्यमिक स्तरावरील विध्यार्थ्याचे अमूर्त संबोधाबाबतच्या आकलनाचा शोध घेतला आहे.

संशोधनात इयता नववीच्या प्रथम भाषा मराठी या विषयातील अमूर्त संबोध शोधून ते विदयार्थ्यांना आकलन होण्यात येणा-या अडचणीचा शोध घेतला आहे. यासाठी प्रायोगिक संशोधन पदधतीचा वापर केला आहे . पडताळा सूची व चाचणी ही संशोधन साधने वापरली आहेत. मिळालेल्या माहितीचे संख्याशास्त्रीय विश्लेषण करुन त्या आधारे निष्कर्ष मांडले आहेत.

१. प्रस्तावना

सन २००८ व २०१० च्या राज्य अभ्यासक्रम आराखड्यात शालेय शिक्षणाच्या भावी गरजांचा विचार करण्यात आला आहे. यात शिक्षणाची उद्दिष्टे, मुलांचा सामाजिक व्यापक अर्थाने विचार,ज्ञानाचे स्वरुप आणि मानवी शिकण्याची प्रक्रिया या सर्व गोष्टींचा विचार करण्यात आला आहे.

या आराखड्यात ज्ञानाची निर्मिती करणे, सृजनशीलतेला उठाव देणे, विद्यार्थांना उपक्रमशील करणे अनुभवधिष्टित पद्धतीने शिक्षण देणे, याचबरोबर कृतीचे निरीक्षण, संशोधन, विश्लेषण करणे याही गोष्टींना महत्त्व द्यावे लागेल हे नमुद केले आहे. त्याशिवाय प्रत्येक व्यक्तिजवळ असणा-या क्षमता, मूल्यांत्मक दृष्टी आणि सांस्कृतिक स्वप्न यांचे उन्नमय होणे गरजेचे आहे. अशा पध्दतीने अध्ययन व अध्यापन होणे अपेक्षित आहे. यामुळे इथून पुढे शालेय परीक्षेमध्ये आशयावर आधारीत उत्तरांच्या परीक्षणापेक्षा, प्रश्न सोडविताना विद्यार्थ्यांला प्रश्न किती आकलन झाला हे पाहवे लागणार आहे.

विद्यार्थ्यांचे शिकणे, त्याचे आकलन होणे हे मातृभाषेतील समृध्द भाषा शिक्षणावर आधारित आहे. यासाठी भाषा विषयाची म्हणजे मराठीची पाठ्यपुस्तके उपयोगी ठरतात. पुस्तकात दिलेल्या पाठ्याशांमध्ये, आशयामध्ये विविध संबोधांचा समावेश असतो. एव्हांना विविध संबोधांनीच मिळून आशय बनलेला असतो. आशयात समाविष्ट असणारे हे विविध संबोध विद्यार्थ्यांला समजले तर त्याचे शिकणे व विषय समजून घेणे अधिक सुकर होते.

● आकलन अर्थ/व्याख्या

समजण्याची शक्ती, अगर क्षमता, मानशास्त्रीयदृष्ट्या एखादी गोष्ट समजावून घेत असता आपणास काय समजते याची जाणिव ज्या प्रक्रियेत होते ती आकलन शक्ती. सोहनी, शं.कृ. (शैक्षणिक टीपाकोश १९९३)

आकलन म्हणजे समजणे होय.

आकलन पातळी/स्तर

आकलनाच्या चार पातळ्या असून त्या चढत्याक्रमाने आहेत. यात प्रत्येक पातळीवर माहिती किती समजली आहे किंवा समजणे हे अंतर्भूत आहे.

(१) भाषांतर (रुपांतर) पातळी : यात अचूक अनुवाद करण्याचे कौशल्य अभिप्रेत आहे. एका भाषेतून दुस-या भाषेत भाषांतर करणे, भाषिक विधानाचे अभाषिक विधानात रुपांतर करणे, वाच्यार्थ्याचे आकलन होणे इत्यादी कौशल्ये अभिप्रेत आहेत.

(२) बोधन पातळी (अर्थ लावणे) : माहितीला अर्थ लावणे, मध्यवर्ती कल्पना सांगता येणे. उदाहरणे देणे, ओळखणे, वर्गीकरण करणे, माहितीचे सुसूत्रीकरण करणे इत्यादी कौशल्ये यात अभिप्रेत आहेत.

(३) तर्क पातळी : तर्कशुदध आकलन माहितीवरुन तर्क करणे, निष्कर्ष काढणे, अनुमान काढणे अमूर्त संबोध (संकल्पना) स्पष्ट करणे इत्यादी कौशल्ये यात अभिप्रेत आहेत.

(४) मूल्यमापन पातळी : प्रवाहाच्या व प्रवृत्तीच्या विस्ताराचे, परिणामांचे ज्ञान व त्यावरुन त्यांचे भावी स्वरुप जाणण्याचे कौशल्ये, निवाडा करणे, बाजू मांडणे, निर्णय घेणे, विचारात घेणे, टीका करणे, निष्कर्ष काढणे इत्यादी कौशल्ये यात अभिप्रेत आहेत.

सदर संशोधनात आकलनाच्या पहिल्या तीन पातळ्यांचा विचार केला आहे.

२) संशोधनाची गरज व महत्त्व

महाराष्ट्रामध्ये मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये माध्यमिक स्तरावर मराठी भाषा (विषय) ही प्रथम दर्जाची भाषा म्हणून शिकली व शिकविली जाते. इतर सर्व विषयांचे शिकण्याचे माध्यम ही मराठी आहे. त्यामुळे मराठी विषय अध्यापकाची भूमिकाही अत्यंत महत्त्वाची व जबाबदारीची आहे. मराठी विषय शिकविताना पाठ्यक्रमाची,अभ्यासक्रमाची उद्दिष्टे विचारात घेवून पाठ्यपुस्तकातील आशयाचा शिक्षकाला नीट,बारकाईने अभ्यास करावा लागतो.

पाठ्यपुस्तकात समाविष्ट असणारे घटक गद्य,पद्य, व्याकरण व लेखन अध्यापन करताना आशयातील शब्द, वाक्य, म्हणी, वाक्यप्रचार, नियम, संदेश, घटना, वाङ्:मयप्रकार, संबोध, संज्ञा, मध्यवर्ती कल्पना, तपशील, मूल्ये इत्यादी बाबी शिक्षकाला स्वत: समजावून घेऊन विद्यार्थ्यांना शिकवाव्या लागतात. तसेच आशयात मूर्त संबोधकाबरोबर अमूर्त संबोधही असतात. संबोधांमध्ये परस्पर संबंध असतो. पुस्तकातील आशय हा विविध संबोधांनी बनलेला असतो.

सदर संशोधनामुळे मराठी विषय शिक्षकांना अमूर्त संबोध समजण्यामध्ये विद्यार्थ्यांना येणा-या अडचणी समजतील व त्यांना अमूर्त संबोध स्पष्टीकरणासाठी मदत होईल.तसेच त्याचे आशयज्ञान समृध्द होईल. या संशोधनामुळे मराठीतील अमूर्त संबोधाबरोबर इतर विषयातील त्याच अर्थाच्या संबोध आकलनासाठी उपयुक्त ठरेल. परिणामी मराठी विषयाची उद्दिष्टे साध्य होण्यासाठी मदत होईल.

३) शीर्षक

माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचे अमूर्त संबोधाबाबतचे आकलन - एक अभ्यास.

४) कार्यात्मक व्याख्या

(१) माध्यमिक स्तर :

सन १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार ५+३+२ या आकृतीबंधानुसार इयत्ता आठवीनंतरचे दोन वर्ग म्हणजे इयत्ता नववी व दहावी या दोन वर्गांचा माध्यमिक स्तरामध्ये समावेश होतो. प्रस्तुत संशोधनासाठी फक्त नववीच्या वर्गाचा विचार करण्यात आला आहे.

(२) विद्यार्थी :

विद्येची साधना करणारी व्यक्ती किंवा औपचारिक शिक्षण घेणारी व्यक्ती.

(३) अमूर्त संबोध :

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे यांनी प्रकाशित केलेल्या इयत्ता नववीच्या क्रमिक पाठ्य पुस्तकातील ज्या संबोधाचे उपसंबोध मांडता येतात व तपशीलाची मांडणी क्रमबदधरीत्या केल्यास त्याचा अर्थबोध होतो. अशा संबोधास अमूर्त संबोध असे म्हटले आहे.

(४) आकलन :

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे यांनी तयार केलेल्या इयत्ता नववीच्या क्रमिक पुस्तकातील जे संबोध विद्यार्थ्यांना केवळ आकलनाच्या अर्थ पातळीवर आत्मसात न होता, आकलनाच्या

उच्च स्तरावर-बोधन व तर्क पातळीवर आत्मसात व्हावेत अशी अपेक्षा आहे असे अमूर्त संबोध समजणे म्हणजे आकलन होय.

५) संशोधनाची उद्दिष्टे

(१) इयत्ता नववीच्या मराठी विषयाच्या क्रमिक पाठ्यपुस्तकातील अमूर्त संबोधाचा शोध घेणे.

(२) इयत्ता नववीतील विद्यार्थ्यांना अमूर्त संबोधाचे आकलन होण्यात येणा-या अडचणींचा शोध घेणे.

६) संशोधनचे गृहितक

(१) माध्यमिक स्तरावरील मराठी विषयाच्या पाठ्यपुस्तकामध्ये अमूर्त संबोध असतात.

७) संशोधनाची व्याप्ती

(१) प्रस्तुत संशोधनाव्दारे प्राप्त होणारे निष्कर्ष महाराष्ट्रातील सर्व मराठी माध्यमांच्या माध्यमिक स्तरावरील मराठी विषयाला लागू पडतील.

(२) संशोधनाव्दारे प्राप्त होणारे निष्कर्ष माध्यमिक स्तरावरील काम करणा-या शिक्षकांना मार्गदर्शनासाठी उपयुक्त ठरतील.

८) संशोधनाची परिमर्यादा

(१) प्रस्तुत संशोधन हे माध्यमिक अभ्यासक्रमातील इयत्ता नववीच्या प्रथम भाषा मराठी विषयाच्या पाठ्यपुस्तकातील अमूर्त संबोधापुरते मर्यादित आहे.

(२) संशोधन हे माध्यमिक स्तरावरील इयत्ता नववीच्या मराठी विषयाच्या पाठ्यपुस्तकातील गद्य विभागापुरते मर्यादित आहे.

(३) संशोधन हे मराठी विषयाच्या पाठ्यपुस्तकातील संशोधकाने निश्चित केलेल्या अमूर्त संबोधापुरते मर्यादित आहे.

(४) संशोधन हे भुदरगड तालुक्यातील (जि.कोल्हापूर) येथील सहशिक्षण देणा-या मराठी माध्यमाच्या सहशिक्षण देणा-या शाळांपुरते मर्यादित आहे.

९) संशोधन पदधती

संशोधन समस्येनुसार संशोधनासाठी वापरली जाणारी पदधती निश्चित केली जाते. सदर संशोधन वर्तमान काळाशी निगडीत असल्यामुळे वर्णनात्मक सर्वेक्षण पदधतीचा वापर केला आहे.

१०) संशोधन साधने

(१) पडताळा सूची (२) चाचणी

११) संशोधनाची कार्यपदधती

संशोधन समस्येच्या उद्दिष्टांना अनुसरुन संशोधकाने प्रथम भाषा मराठी विषयाच्या उद्दिष्टांनुसार इयत्ता नववीच्या पाठ्यपुस्तकातील अमूर्त संबोधाचा शोध घेण्यासाठी पडताळा सूचीचा वापर केला. तसेच विद्यार्थ्यांना निश्चित केलेल्या अमूर्त संबोधाचे आकलन होण्यात येणा-या अडचणींचा शोध घेण्यासाठी चाचणीचा वापर केला.

१२) जनसंख्या व नमुना निवड

कोल्हापूर जिल्ह्यातील भुदरगड तालुक्याची निवड सप्रयोजन पदधतीने केली. भुदरगड तालुक्यातील मराठी माध्यमाच्या मिश्र माध्यमिक शाळांपैकी १० शाळांची निवड लॉटरी पदधतीने केली.

१३) संख्याशास्त्रीय विश्लेषण

प्रस्तुत संशोधनासाठी अमूर्त संबोधांची निश्चिती करण्यासाठी शिक्षकांकडून पडताळा सूची भरुन घेतली. अमूर्त संबोध आकलनातील अडचणी शोधण्यासाठी निवडलेल्या शाळांतील विद्यार्थ्यांकडून चाचणी सोडवून घेतली. मिळालेल्या माहितीचे संख्याशास्त्रीय विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात आले व त्याआधारे निष्कर्ष काढण्यात आले.

प्रस्तुत संशोधनासाठी शेकडेवारी या संख्याशास्त्रीय साधनाचा वापर केलेला आहे.

१४) निष्कर्ष

(१) माध्यमिक अभ्यासक्रमातील प्रथम भाषा मराठी विषयाच्या उद्दिष्टांनुसार इयत्ता नववीच्या क्रमिक पाठ्यपुस्तकातील निवडलेले अमूर्त संबोध-अस्तित्व, ललितकला, पौर्वात्य, पाश्चिमात्य, शैली, रसिक, निसर्ग, प्रेम, प्रतिज्ञा, श्रद्धा,

विज्ञान, आठवण, नांगरी संस्कृती कादंबरी, पुराण कथा, चरित्र, कथा, नाटक, जातक कथा, वैचारिक लेखन, ललित लेखन, काव्य, सृजनशील लेखन, लोकगीत, लोकधारणा, संस्कृती, भूतदया, ऋण, कृतज्ञता, अहिंसा, सृष्टी, अनुभव कथन, शिल्प, चिंतन, उत्सव, युग, ज्ञान, शिक्षण, प्रवास, भाव, वाट, सांगावा,भटके, ऊन-सावली, सौंद्र्य, श्रम हे योग्य आहेत.

(२) इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांना विचारलेल्या अमूर्त संबोधापैकी कादंबरी या संबोधाचे आकलन झाले नाही. बहुतांश विद्यार्थ्यांना आकलनाच्या भाषांतर पातळीवरील अमूर्त संबोधाचे आकलन होण्यात अडचण नाही तर बोधन व तर्क पातळीवरील अमूर्त संबोध आकलन होण्यात अडचण आहे.

१५) शिफारशी

(१) माध्यमिक स्तरावरील मराठी विषय शिक्षकांनी विद्यार्थ्यांना अमूर्त संबोध आकलनासाठी विविध अध्यापन कार्यपद्धती वापरणे आवश्यक आहे.

(२) शिक्षकांनी अमूर्त संबोध आकलनासाठी बहुमाध्यम संचाचा वापर करावा.

(३)शिक्षकांनी विद्यार्थ्यांना अमूर्त संबोध आकलन होण्यासाठी दिल्या जाणा-या अध्ययन अनुभवात निबंध लेखन, पत्रलेखन, गोष्ट लिहणे, आकलनावर आधारित कृती, शब्दकोशाचा वापर व संदर्भांचा वापर यात वाढ करावी.

(४) शिक्षकांनी साहित्यातील विविध संबोध आकलनासाठी पूरक वाचन, पुस्तक परीक्षण यासारखे उपक्रम राबवावेत.

(५) मुख्याध्यापकांनी शिक्षकांना साहित्य संमेलने, प्रदर्शन, व्याख्याने, चर्चासत्रे यामधील सहभाग घेण्यास प्रेरणा द्यावी. नवोपक्रमशील शिक्षकास प्रोत्साहन द्यावे.

(६) मुख्याध्यापकांनी शाळेत जयंती, पुण्यतिथी, लेखकांच्या प्रकट मुलाखती, काव्यवाचन, गीतगायन, बालसाहित्य संमेलन, बालसाहित्यपत्रक असे उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना अभिव्यक्तीस संधी द्यावी.

(७) शाळेने साहित्य संमेलन, नाट्यसंमेलन, वाचनालय, पुस्तक प्रदर्शन अशा ठिकाणी भेटीचे नियोजन करावे.अशामुळे भाषिक अनुभवात अभिवृद्धी होईल व त्यामुळे अमूर्त संबोध आकलनात भर पडेल.

संदर्भ

१) अकोलकर, ग.वि.व पाटणकर, ना. ग. (२००५). मराठीचे अध्यापन. पुणे: व्हीनस प्रकाशन.
२) गवस, राजन. (१९९५). मराठी आशययुकत अध्यापन, पुणे: मेहता पब्लिशिंग हाऊस.
३) जगताप, ह.ना. (२००५). प्रगत शैक्षणिक तंत्रविज्ञान आणि माहिती तंत्रविज्ञान. पुणे : नित्यनूतन प्रकाशन
४) जोशी, प्र. न. (संपादक). (१९८२). आदर्श मराठी शब्दकोश पुणे : विदर्भ मराठवाडा बुक कंपनी.
५) फडके, वासंती. (१९८८). अध्यापनाची प्रतिमाने. पुणे : नूतन प्रकाशन.
६) मुळे, रा. शं. व उमाटे, वि. तु. (१९८७).शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे. नागपूर : महाराष्ट्र विदयापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ.
७) मराठी कुमार भारती इयत्ता नववी (२०१२). महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे.